# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र. 283/2023   दिनांक : 23.07.2023

## 1)घरफोडी :–

**विमानतळ :–**दिनांक 20.07.2023 रोजी 18.00 वा. ते दिनांक 22.07.2023 रोजी 02.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी शिवनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे राहते घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून कपाटातील सोन्या चांदीचे दागीने, टी.व्ही. व नगदी असा एकुण 26,800/– रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शकुंतलाबाई बाबुराव खंगले, वय 65 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. शिवनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 249/2023 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री पांचाळ, मो.क्रं. 9423437844** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**उस्माननगर :–**दिनांक 19.07.2023 रोजी 19.00 वा. दिनांक 20.07.2023 रोजी 12.00 वा. चे दरम्यान, **शंकर येडे यांचे शेतात मौजे हतनी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयाने क्रेशर पॉईंट वरील ठेवलेल्या विद्युत ट्रान्सफार्मर मधील तांब्याचा तार 100 किलो किंमती 40,000/–रूपयाचा चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संजय गणपतराव उबाळे, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मारतळा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 110/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1119 श्रीमंगले, मो. क्र. 9511645433** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**रामतीर्थ :–** दिनांक 21.07.2023 रोजी 09.00 वा. ते दिनांक 22.07.2023 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **घरासमोरून शामनगर, नरसी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा एक्टीव्हा कंपणीची मो. सा. क्रमांक एमएच–26/सीएफ–2745 किंमती 70,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अरविंद विठ्ठलराव दिंडे, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. नरसी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 112/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवाडे, मो. क्रं. 8888858666** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**विमानतळ :–**दिनांक 21.07.2023 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी शिवनगर, नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन तु घर खाली का करत नाहीस म्हणुन फिर्यादीचे घरात घुसून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करून लोखंडी रॉड, हॉकी स्टीकने फिर्यादीचे उजव्या हातावर मारून गंभीर दुखापत केली. व फिर्यादीची मुलगी सोडवण्यास आली असता मुलीचे केस धरून नाकावर तोंडावर थापड बुक्यानी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सौ. सुमनबाई कांतीलाल जोगळेकर, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शिवनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 248/2023 कलम 143,147,148,149,452,326,324,504,506 भादवि, कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री जाधव, मो.नं. 8007580146** हे करीत आहेत.

## 5)अत्यावश्यक वस्तु अधिनियम :–

**अर्धापूर :–** दिनांक 22.07.2023 रोजी 09.10 वा. चे सुमारास, **अर्धापूर ते नांदेड रोडवर महामार्ग पोलीस चौकीजवळ अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून ट्रक क्रमांक एमएच–26/बीई–9397 चा चालक व मालक यांनी सदर ट्रकमध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पांढऱ्या पोत्यामध्ये तांदूळ भरून असलेले पोते 30 टन किंमती 9,00,000/–रूपयाचा असा एकुण 34,00,000/–रूपयाचा माल शासकीय परवाना नसताना बेकायदेशीर रित्या काळया बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेला मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री दशरथ गोविंदराव तलेदवार, ने. उप विभागीय पोलीस अधिकारी उप विभाग, नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 242/2023 कलम 3,7 अत्यावश्यक वस्तु अधिनियम 1955 प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/श्री गायकवाड, मो.क्रं. 8888717999** करीत आहेत.

## 6)अवैध गुटखा बाळगला :–

**मांडवी :–** दिनांक 22.07.2023 रोजी 11.15 वा. चे सुमारास, **पोलीस स्टेशन मांडवी समोरील रोडवर लक्ष्मी चौक मांडवी ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या एका काळया रंगाच्या स्कार्पिओ कंपनीची गाडी क्रमांक एमएच–26/पी–0900 किंमती 3,00,000/– रूपयाची मध्ये राज्य शासनाने बंदी घातलेला विवीध कंपणीचा अवैध गुटखा किंमती 4,68,000/–रुपये असा एकुण किंमती 7,68,000/– रूपयाचे मालासह ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2720 प्रकाश मुंगसाजी आसोले, ने. पोस्टे मांडवी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी गुरनं 63**/2023 कलम 188,272,273,328 भादवी सह कलम 59,30,26(2)(V),27(2) अन्न सुरक्षा मानदे कायदा 2006 प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री कराले, मो.क्रं. 8390434340** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)देगलूर** :– दिनांक 22.07.2023 रोजी 16.55 वा. चे सुमारास, **देगलूर मोंढा परीसरात सार्वजनिक ठिकणी मोकळया मैदानात, देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी गोलाकार बसुन बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4800/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री श्रीकांत माधवराव मोरे, ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 336/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/580 तलवारे, मो.क्रं. 9764574333** हे करीत आहेत.

**2)तामसा** :– दिनांक 22.07.2023 रोजी 15.45 वा. चे सुमारास, **आठवडी बाजार ग्राम पंचायतचे शेडमध्ये, तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार, कल्याण व मीलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 28,485/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दिगांबर पांडुरंग पाटील, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 63/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2498 कल्याणकर, मो.क्रं. 9284038840** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**कुंटूर** :– दिनांक 22.07.2023 रोजी 06.45 वा. चे सुमारास, **मांडणी फाटा ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/नागोराव महिपतराव पोले, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 132/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2315 सोनकांबळे, मो.नं. 9423657260** हे करीत आहेत.

## 9)गळफास घेवुन आत्महत्या :–

**भाग्यनगर** :–दिनांक 22.07.2023 रोजी 06.00 वा. चे पुर्वी, **राहते घरी जैन मंदीर मालेगाव रोड, नांदेड येथे,** यातील **मयत नामे नरेंद्र मनोहर तेलंगे, वय 23 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. जैन मंदीर मालेगाव रोड जवळ, नांदेड** यांनी एफ.टी.आय. आय. परिक्षा नापास झाल्याने घरामधील पंख्याच्या हुकाला डोक्याला बांधायच्या फेटयाने गळयास बांधुन गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार मनोहर रामचंद्र तेलंगे, वय 57 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. जैनमंदीर मालेगाव रोड जवळ, नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भाग्यनगर** आ. मृ. **29**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2252 तोडसाम, मो.नं. 7720839111** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  284/2023                    दिनांक : 23.07.2023

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"लोकमान्य बाळ गंगाधर टिळक"** यांची जयंती साजरी

23 जुलै, 2023 रविवार रोजी **"लोकमान्य बाळ गंगाधर टिळक"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. या प्रसंगी **श्री पांडुरंग माने** , सपोनि, स्थागुशा, नांदेड, यांनी पुष्पहार अर्पण करून **"लोकमान्य बाळ गंगाधर टिळक"** यांना अभिवादन केले. या प्रसंगी **श्री टी.एस. डळाळे,** पोउपनि, **श्री तानाजी शिंदे,** सपोउपनि, पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड यांचे सह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **पोहेकॉ/संजय सांगवीकर, मपोकॉ/शामका पवार, पोकॉ/विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

